# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 25/03/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### दुखापत

पो.स्टे. खापा :— अंतर्गत 4 कि. मी अंतरावर मौजा गडेगाव येथे दिनांक 24/03/2021 चे 10:30 वा. ते 19.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजकुमार बिहारी यादवार वय 32 वर्ष रा. गडेगाव व आरोपी नामे— प्रभाकर लायबर वय 50 वर्ष रा. गडेगाव हे दोन्ही एकाच गावातील असुन फिर्यादी याने आरोपीस मोटरसायकलवर बसवुन गडेगाव येथे नेले नाही. याकारणावरून आरोपी हा फिर्यादीचे घरासमोर रोडवर जावुन फिर्यादीस म्हटले की, ''तु मला तुझ्या बाईकवर बसवुन का आणले नाही'' असे म्हणुन आरोपीने फिर्यादीच्या कपाळावर व डाव्या हातावर चाकुने वार करून फिर्यादीस जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 326 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अजय मानकर मो.न. 9422942764 हे करीत आहे.

### गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत 15 कि. मी अंतरावर मौजा माहुरझरी येथे दिनांक 24/03/2021 चे 15.15 वा. सुमारास फिर्यादीची मुलगी पुजा शंकर नेउल वय 29 वर्ष रा माहुरझरी हीने अज्ञात कारणाने आपले राहाते घरी स्लॅप वर लागलेल्या हुकला दुपटयाने बांधुन गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शंकर अर्जुन नेउल, वय 59 वर्ष, रा. माहुरझरी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ राजेश वानखेडे पो.स्टे कळमेश्वर मो.क्र.9850492065 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :— अंतर्गत मौजा हल्दीराम कंपनी गुमथळा येथे दिनांक 24/03/2021 चे 08.15 वा. सुमारास फिर्यादी नामे— आशिष मनोहर पडोले, वय 36 वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा हे आपल्या सहकार्या बरोबर कामासाठी जात होते. त्यादरम्यान त्यांना घटनास्थळावर पार्कींगमध्ये उभा असलेल्या एमएच—40/बीएल—2811 क्रमांकाच्या लाल रंगाच्या आयसर गाडीच्या पल्याच्या रॉडला गाडीच्या डाव्या साईडला एका नारळाच्या दोरीला एक इसम गळफास लागलेला दिसला. त्यादरम्यान एका इसमाने सांगितले की, ''मृतक हा तेथे दि. 23/03/2021 पासुन काम करतो व त्याचे नाव शशिकांत रामभाउ आगरे(मृतक) वय 36 वर्ष रा. बिडीपेठ नागपुर असे आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आशिष मनोहर पडोले वय 36 वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री आगासे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर